Adv. Vikas S. Pawar (Deshmukh)
B.A.L.L.B. , Advocate, High Court,
Aurangabad

SAWLI, Plot No.2 ,
Line No.1, Prakash Nagar
East, N-2, CIDCO
Aurangabad
Mob. : 9890537354

Email : adv.vsp_143@rediffmail.com

Date : 29/09/2017

शोध अहवाल (सर्च रिपोर्ट)

अमोल सुरेश उकर्डे व विनय सुरेश उकर्डे, रा. करमाड, ता.जि. औरंगाबाद यांनी सांगितल्यानुसार मी पुढीलप्रमाणे शोध अहवाल (सर्च रिपोर्ट) सादर करत आहे.

शोध मालमत्तेचे वर्णन : मौजे करमाड, ता.जि. औरंगाबाद येथील गट नं. २१९ मधील अमोल सुरेश उकर्डे व विनय सुरेश उकर्डे यांचे सामाईक क्षेत्रा जे की, ०.३२.८२ अर व ०.४१ आर

सदर मिळकती बाबत मी २००२ पासून कागदपत्रांची पाहणी केली असता माझ्या असे लक्षात आले की, दि. २१.०६.२००२ रोजी अभिहस्तांतरण पत्राद्वारे बाबुराव आबाजी उकर्डे यांनी त्यांच्या नावावरील शेतजमीन अमोल सुरेश उकर्डे व विनय सुरेश उकर्डे यांचे अपाक म्हणुन श्रीमती अनिताबाई सुरेश उकर्डे व स्वतः त्यांच्या नावे डॉक्युमेंट नं. ४०५८ नुसार केली. तसेच काही शेतजमीन डॉक्युमेंट नं. ४०५९ नुसार अभिहस्तांरण पत्राद्वारे सुरेश बाबुराव उकर्डे यांच्या नावे केली. दि. ०७.०३.२०१४ रोजी रमेश बाबुरव उकर्डे, सौ. लता विश्वास कचकुरे, सौ. शारदा नारायण बागल, बाबुराव आबाजी उकर्डे यांनी अभिहस्तांतरणद्वारे गट नं. २१९ मधील क्षेत्र ०.४५ आर जमीनीचे अभिहस्तांतरण अमोल सुरेश उकर्डे व विनय सुरेश उकर्डे यांच्या नावे केली. डॉक्युमेंट नं. ४०४४ नुसार सुरेश बाबुराव उकर्डे व विनय सुरेश उकर्डे यांचे मुख्त्यारआम म्हणुन अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ मधील प्लॉट नं. १३ निवृत्ती भानुदास उकर्डे यांना अभिहस्तांतरण केले आहे. डॉक्युमेंट नं. ६०४१ गट नं. २१९ मधील प्लॉट नं. १ गहाणखत म्हणून महेश नागरी पतसंस्था मर्या. जालना ठेवलेला आहे. तसेच डॉक्युमेंट नं. २८४० नुसार मुख्त्यारआम म्हणून अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ मधील प्लॉट नं. ६ अर्जुन वैजीनाथ तारो यांना अभिहस्तांतरण केला आहे. दि. १४.०१.२०१६ डॉक्युमेंट नं. ३०३ मुख्त्यारआम म्हणून अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ मधील प्लॉट नं. १२ श्रीमंत भिमराव भोसले व गणेश आत्माराम तारो यांना अभिहस्तांतरण केला आहे. दि. २२.०२.२०१६ डॉक्युमेंट नं. ११००

Scanned by CamScanner

मुख्त्यारआम म्हणुन अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ पैकी प्लॉट नं. २९ दिनेश जनार्धन कोरडे यांना अभिहस्तांतरण केला आहे. दि. ०६/०५/२०१६ डॉक्युमेंट नं. २९७३ मुख्त्यारआम म्हणून अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ पैकी प्लॉट नं. २ स्वप्ना जितेंद्र जाधव यांना अभिहस्तांतरण केला आहे. दि. १९.०१.२०१६ डॉक्युमेंट नं. ४२२ मुख्त्यारआम म्हणून अमोल सुरेश उकर्डे यांना गट नं. २१९ पैकी प्लॉट नं. २८ लहु सिताराम तारो यांना अभिहस्तांतरण केला आहे. दि. २१.१०.२०१६ डॉकुयमेंट नं. ७१७७ मुख्त्यारआम म्हणुन गट नं. २१९ श्रीराम नगर मधील प्लॉट नं. ९ अप्पासाहेब जगन्नाथ कुटे व गणेश जगन्नाथ कुटे यांना अभिहस्तांतरण केला आहे. दि. २९.०४.२०१७ डॉक्युमेंट नं. १५४४ हक्कसोडपत्राद्वारे श्रीमती अनिता सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ पैकी ४१ आर विनय सुरेश उकर्डे व अमोल सुरेश उकर्डे यांच्या हक्कात विनामोबदला सोडुन दिला. दि. ०५.०१.२०१७ डॉक्युमेंट नं. ८२ नुसार मुख्त्यारआम म्हणुन अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ पैकी प्लॉट नं. १० दिपली बापुराव हजारे व बापुराव साहेबराव हजारे यांना हस्तांतरण केला आहे. दि. १८.०१.२०१७ डॉक्युमेंट नं. ३७९ मुख्त्यारआम म्हणून अमोल सुरेश उकर्डे यांनी गट नं. २१९ पैकी प्लॉट नं. ४ रुपेशकुमार रामराव कल्याणकर यांना अभिहस्तांतरण केला आहे.

सदर मिळकती बाबत महा ई सेवा केंद्रातुन ७/१२ काढला असता त्यावर नोंदी ह्या सन २०१४ ते २०१५ च्या असल्यामुळे सदरील मालमत्ता संदर्भात सर्च करण्याच्या उद्देशाने मी दुय्यम सहायक निबंध श्रेणी ३ औरंगाबाद यांच्या कार्यालयात रितसर आवश्यक ते पैसे भरले.

सदरील मिळकतीसंदर्भात तपासलेली कागदपत्रे -

१. सन २००२ चा ७/१२ उतारा

२. ऑन लाईन पोर्टलवरील ऑनलाईन सर्च

वरील कागदपत्राच्या आधारे व प्रत्यक्ष रित्या दुय्यम निबंध क्र. ३ औरंगाबाद कार्यालय येथे वरील मिळकती संदर्भात शोध घेतला. उपलब्ध अभिलेख व कागदपत्रावरुन असे आढळुन येते की, सदर मिळकती ही मुळ मालक सुरेश उकर्डे यांच्या मालकीची होती. ७/१२ वरील नोंदी नुसार सुरेश बाबुराव उकर्डे यांच्या मालमत्तेच्या वाटण्या वरुन काही क्षेत्र हे स्वतंत्र रित्या त्यांच्या वारसांच्या नावे व काही क्षेत्र अमोल सुरेश उकर्डे व विनय सुरेश उकर्डे यांचे सामाईक नावावर आहे. वरील सर्च घेत असतांना अमोल सुरेश उकर्डे व विनय सुरेश उकर्डे यांनी प्लॉट नं. १ हा महेश नागरी सहकारी पत संस्था मर्या. जालना यांच्याकडे तारण ठेवलेला आहे. वरील सर्व कागदपत्रे तसेच शोध घेतला असता असे आढळुन आले की, अमोल उकर्डे व विनय उकर्डे यांचे गट नं. २१९ मौजे करमाड, ता.जि. औरंगाबाद हद्दीमध्ये ०.३२.८२ आर व ०.४१ आर हे सामाईक क्षेत्र आहे. व ते त्यांच्या ताब्यात व अधिकारात आहे.

Scanned by CamScanner

सदरील मिळकती बाबत सन २०१४ ते २०१५ या वर्षाच्या कालावधीत तसेच ऑनलाईन पोर्टल नुसार औरंगाबाद येथील मा. दिवाणी न्यायालयात काही वाद प्रलंबित आहे किंवा निकाली निघालेला आहे किंवा मा. न्यायालयाचे सदर मिळकती बाबत काही आदेश/न्याय निर्णय आहे किंवा कसे या बाबतची माहिती सदरील न्यायालयातून घेतली असता असे लक्षात आले की, सदरील मिळकती बाबत कुठलाही वाद प्रलंबित असल्याचे किंवा निकाली निघाल्याचे दिसुन येत नाही. उपलब्ध ७/१२, महा ई सेवा केंद्रा नुसार सदरील मिळकतीवर कुठल्याही प्रकारचे कर्ज घेतल्यांची किंवा बोजा असल्याची नोंद दिसून येत नाही.

उपलब्ध अभिलेख व कागदपत्रांचे आवलोकन केल्यावर उपरोक्त नमुद बाबी वरुन सदरील मिळकतीचा शोध घेतले असता असे स्पष्ट होते की अमोल उकर्डे व विनय उकर्डे या सदरील मिळकतीचे सामाईक कायदेशीर मालक व कब्जेदार असुन सदरील मिळकत ही निर्वीवाद आहे.

करीता हा शोध अहवाल (सर्च रिपोर्ट)

दिनांक : २९/०९/२०१७

आपला विश्वासू,

ॲड. विकास एस. पवार (देशमुख)

VIKAS S. PAWAR (DESHMUKH)
ADVOCATE HIGH COURT

Scanned by CamScanner